सेवक संघ महाराष्ट्र रौप्य महोत्सवी वर्ष-२०२२

# सेवक वार्ता

जून -२०२२ वर्ष -३, अंक-८

कार्यालय - संत एकनाथ नगर, भाग-१ 'यशोपर्व', एनव्हीजन कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७

## सेवक संघ विशेष वृत्त

### कन्हारगाव अभयारण्य व्यवस्थापन आराखडा अपडेट ......

**सेवक संघास कन्हारगाव वन्यजीव अभयारण्याचा आराखडा तयार करण्याचे काम देण्यात आले होते. सदर २०६ पानी पाच वर्षाचा आराखड्यास प्रमुवसं (वन्यजीव) म.रा. तथा मुख्य वन्यजीव रक्षक म्. रा. मान्यता दिली आहे. तसेच या आराखड्याचे मानधनाचा अंतिम हप्ता देखील मिळाला आहे.**

### सेवक संघ संकेतस्थळ देखभाल

www.mahasevaksangh.com या सेवक संघ महाराष्ट्रचे संकेत स्थळावर सेवक संघाच्या विशेष वृत्तांत, सेवक वार्ता इत्यादी माहिती अद्ययावत करण्यात आली आहे.

### सेवक संघाचे सदस्यांकडून जागतिक पर्यावरण दिन साजरा

**सेवक संघाच्या धुळे शाखेचे आजीवन सदस्य श्री. एम. बी. पटवर्धन यांनी पुणे येथे रोप लावून जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. त्याप्रसंगी त्यांची कन्या डॉ.मृणाल पटवर्धन व तिची मैत्रीण डॉ. स्वाती पालानी यांनी सहभाग घेतला. सेवक संघातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन.**



### धुळे शाखा विशेष उपक्रम

धुळे वन वृत्तातील नंदुरबार वन विभागातील काही गावांसाठी सामूहिक वन हक्कव्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे आलेल्या मागणीवरून श्री एस के गवळी अध्यक्ष, सेवक संघ, धुळे शाखा यांनी दिनांक 24 मे 2022 रोजी श्रीमती मनीषा खत्री, जिल्हाधिकारी धुळे यांची त्यांचे कार्यलयात उप वन संरक्षक नंदुरबार वन विभाग श्री. के. बी. भवर यांच्यासोबत भेट घेतली व त्याबाबत चर्चा केली. जिल्हाधिकारी यांनी प्रायोगिक तत्वावर 3 गावांचे व्यवस्थापन आराखडे तयार करण्याबाबत सूचना दिल्या. त्यानुसार लवकरच पुढील कार्यवाही उप वन संरक्षक नंदुरबार वन विभाग योचेकडून करण्यात येईल. या भेटी दरम्यान सेवक संघाचे शहादा येथील सदस्य श्री. आर.एम. शास्त्री यांच्या सोबत होते या कामी श्री व्ही.टी. पत्की सर यांचे नेहमीप्रमाणे मार्गदर्शन लाभले आहे.

*******************************

### ५ गावांचे व्यवस्थापन आराखडे तयार करण्याबाबत कार्यारंभ आदेश प्राप्त

उप वन संरक्षक नंदुरबार वन विभाग कडून प्रायोगिक तत्वावर नवापूर तालुक्यातील २, तालुक्यातील २, धडगाव शहादा तालुक्यातील २, असे एकूण ५ गावांचे व्यवस्थापन आराखडे तयार करण्याबाबत दिनांक 24 जून 2022 चे पत्रान्वये कार्यारंभ आदेश प्राप्त झालेत. त्याकामी खालील ४ चमू गठीत करणेत आले आहेत.

१) श्री. एम. कुलकर्णी व धोपेश्वरकर
२) पी. आर. पाटील व बी.बी. जोमीवाळे
३) जे.ए. पाटील व एन.एम. निकम
४) एस.के. गवळी व आर. एम. शास्त्री

### मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धुळे श्रीमती भुवनेश्वरी यांची भेट

श्री.एस.के. गवळी आज मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धुळे श्रीमती भुवनेश्वरी यांची भेट घेतली व त्यांना धुळे जिल्ह्याचा पीबीआर तयार झाला नसल्याचे सांगितले असता त्यांना आश्चर्य वाटले व त्यांनी भंडारा जिल्ह्यातील आराखडा तयार झाला आहे असे सांगितले. सेवक संघ महाराष्ट्र हे काम करू शकतो असे प्रतिपादन करून त्यांना आपले माहिती पत्रक दिले. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

या अंकात

१. सेवक संघाच्या नवीन सनदी लेखापालांची नेमणूक...१
२. सेवक संघ संकेतस्थळ देखभाल .........१
३. जागतिक पर्यावरण दिन साजरा.........१
४. धुळे शाखा विशेष उपक्रम ..........१
५. गेळघाटींचे लोकविश्वास व लोककथा....... २
नवी लेख मालिका - चिमणीचा पाडाव...

### कार्यकारी मंडळ बैठक वृत

**सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ केंद्रीय कार्यकारी मंडळाची आभासी सभा श्री. एम.एम. कुलकर्णी कार्यकारी अध्यक्षयांच्या मार्गदर्शनाखाली ७ जून २२रोजी संपन्न झाली. कामकाजाचा वृत्तांत खालीलप्रमाणे असे.**

**विषय क्रमांक १ : केंद्रीय नविन कार्यकारी समिति सदस्यांची नियुक्ती करण्यापूर्वी संबंधीत सदस्यांकडून बंधपत्र लिहून घेणेबाबत.**

**संघाचे कामकाज सुरळीत रित्या पार पाडण्याकरिता नवीन कार्यकारिणी गठीत करतांना संबंधीत सदस्यांकडून ते ३ वर्षे स्वेच्छेने काम करतील व त्या कालावधीत कोणत्याही कारणास्तव राजीनामा देणार नाही असे बंधपत्र लिहून घेण्याबाबत प्रस्तावावर सर्व सदस्यांनी चर्चा करुन प्रस्तावास स्वीकृती दिली.**

**विषय क्रमांक २ : कन्हारगाव अभयारण्य व्यवस्थापन आराखडा अंतीमीकरणाबाबत**

**दिनांक ०२/०५/२०२२ रोजी मुख्य वन्यजीव रक्षक, म.रा.नागपूर यांचे सभेत विभागीय**

व्यवस्थापक, मध्य चांदा वनप्रकल्प विभाग यांनी कन्हारगाव अभयारण्य व्यवस्थापन आराखडयाचे सादरीकरण केले. सदर व्यवस्थापन आराखडा अद्याप राज्य वन्यजीव मंडळासमोर ठेवण्यात आला नसल्याने मान्यता प्रलंबित असल्याचे श्री. पत्की यांनी निदर्शनास आणले.

विषय क्रमांक ३ : शहरांतील वृक्ष मोजणी करीता संगणक प्रणाली विकसीत करणेबाबत.

नगरपालीका व महा नगर पालीका हद्दीतील वृक्ष मोजणीकरिता अद्यावत तंत्रज्ञानावर आधारीत संगणक प्रणाली आवश्यक असलेने निविदा प्रक्रियेत सहभागी होणेकरीता सेवक संघाचे स्वतंत्र वृक्षमोजणी संगणक प्रणालीची गरज श्री. पत्की यांनी विषद केली. प्राथमिक स्वरुपाच्या आवश्यक नोंदी असलेले व कमीत कमी खर्चात (१० ते २० हजार रु.) संगणक प्रणाली तयार करणेबाबतची कार्यवाही करावी अशी सूचना केली.

विषय क्रमांक -४ : नंदूरबार वन विभागातील तीन गावांचे सामूहीक वन हक्क व्यवस्थापन आराखडे तयार करणेबाबत.

नंदूरबार वन विभागातील तीन गावांचे सामूहीक वन हक्क व्यवस्थापन आराखडे तयार करणेकरीता आवश्यक दरपत्रक पाठविणेबाबत उपवनसंरक्षक, नंदूरबार वन विभाग यांनी सेवक संघास पत्र दिलेबाबत श्री गवळी यांनी निदर्शनास आणले. सदर कामाबाबत श्री.पत्की यांनी सविस्तर चर्चा करुन शासन निर्णयानूसार आराखडे तयार करणे बाबत श्री. गवळी यांनी पूढील आवश्यक कार्यवाही करणेबाबत सूचीत करण्यात आले.

विषय क्रमांक ५ : नवनियुक्त सनदी लेखापाल श्री सहस्त्रबुध्दे यांचेशी लेखा कार्यपध्दतीबाबत चर्चा.

नवनियुक्त सनदी लेखापाल श्री. सहस्त्रबुध्दे यांचा काही तांत्रीक कारणामुळे संपर्क होऊ शकत नसल्याने श्री. गवळी यांनी लेखा कार्य पध्दतीबाबत. सद्या प्रचलित असलेली लेखा पध्दती योग्य असल्याचे नवनियुक्त सनदी लेखापाल यांचे मत असल्याचे निर्दशनास आणले. तसेच GSTची रक्कम महिन्याच्य ७ तारखेस भरणा करणे आवश्यक असल्याचे समितीस अवगत केले.

विषय क्रमांक ६: सेवक संघाचे सदस्य नोंदणी आढावा.

अमरावती, नागपूर, नाशिक, धुळे शाखेच्या अध्यक्षांनी त्यांचे अधिनस्त शाखेच्या चालू वर्षातील सदस्य नोंदणी कार्यवाहीबाबत अवगत केले. सदस्यांचे वार्षीक वर्गणी जमा करणेबाबत व जास्तीत जास्त संख्येने नवीन सदस्यांची नोंदणी करणेबाबत आवश्यक कार्यवाही करणेबाबत सूचीत करण्यात आले. शक्यतो आजीवन सदस्य नोंदणी करणे अधीक योग्य राहील असे ठरविण्यात आले.

विषय क्रमांक७ : अमरावती शाखेने केलेल्या मुल्यांकन कामाचा आढावा.

श्री.जगताप यांनी सामाजिक वनीकरण विभाग, अमरावती यांचेकडील रोपवन कामांचे मुल्यांकन करण्यात आले असल्याचे तसेच नविन रोपवन कामांचे मुल्यांकनाबाबत अद्याप विचारणा झाली नसल्याचे निदर्शनास आणले. सा. व. वृत्त, नाशिक यांनी त्यांचे अधिनस्त विभागांचे रोपवनांचे मुल्यांकनकरीता आवश्यक माहिती मागीतलेबाबत श्री.रनाळकर यांनी निदर्शनास आणले. याबाबत पाठपूरावा करणेबाबत सूचित करण्यात आले.

विषय क्रमांक८ : अभयारण्य क्षेत्राचे व्यवस्थापन आराखडे तयार करणे.

ज्या वन्यजीव अभयारण्य क्षेत्राचे व्यवस्थापन आराखडा कालावधी संपूष्टात येत आहे अशा अभयारण्य क्षेत्राची यादी प्राप्त करणेबाबत श्री. वशिष्ठ यांनी आवश्यक कार्यवाही तसेच कन्हारगाव वन्यजीव अभयारण्य व्यवस्थापन आराखडा मंजूर करणे बाबत पूढील आवश्यक पाठपूरावा करणेबाबत सूचित केले.

---

मेळघाटीचे लोकविश्वास व लोककथा

संकलक व लेखक-वि. त्र्यं. पत्की,
भा.व.से. (निवृत्त) भ्रमणध्वनी: 98226 78649
ई मेल: patkivithal27@gmail. com

मागील अंकावरुन......

ते पाहून लाकूड तोडण्याच्या नादात असलेले शंकर क्रुध्द झाले व म्हणाले, " आजपासून तू जंगलात वाघ म्हणून राहशील". त्या प्रसंगा- पासून व्याघ्र निर्मित्ती झाली असा कोरकूंचा विश्वास आहे.

आपण देखील शिकले सवरले असलो वा उच्चभ्रू समाजात वावरत असलो, तरी देखील काही अंध -श्रध्देवर श्रध्दा ठेवतो आणि लोक कथांवर विश्वास ठेवतो की नाही ? मांजर आडवे जाणे,पाल चुकचुकणे, कुत्र्याने रडणे, घुबडाचा घुत्कार, पाल अंगावर पडणे, हातात आरसा पडून फुटणे, बाहेर जातांना कुठे जातो हे विचारणे, राशी भविष्य पहाणे, अमावस्या, ग्रहण यांना अशुभ मानणे इत्यादी. मग बिचाऱ्या आदिवासी/कोरकूंना दोष देण्यास आपण पात्र आहोत कां ?

(समाप्त)

******************************

## चिमणीचा पाडाव...

श्री. विश्वास सावरकर

एक अवघ्या दहा वर्षांचा मुलगा, मोइझुद्दीन आणि झीनत-उन-निसा यांच्या नवव्या मुलाने आपल्या खेळण्यातील बंदुकीने चिमणीला खाली आणले होते. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे सदस्य असलेले त्यांचे पालक वडील अमिरुद्दीन यांनी मुलाला आणि पक्ष्याला बीएनएचएसमध्ये नेले, जिथे त्याचे सचिव डब्ल्यू.एस. मिलर्डने या पक्ष्याला यलो थ्रोटेड स्पॅरो म्हणून ओळखले होते. या घटनेमुळे तो मुलगा भारतातील महान पक्षीशास्त्रज्ञ बनला आणि जगातील महान व्यक्तींपैकी एक - डॉ. सलीम अली. 1985 मध्ये प्रकाशित झालेले त्यांचे आत्मचरित्र 'द फॉल ऑफ अ स्पॅरो' या शीर्षकाने प्रसिद्ध झाले आहे. पिवळ्या गळ्याच्या चिमणीचे आता चेस्टनट-शोल्डर्ड पेट्रोनिया असे नाव देण्यात आले आहे. ही भारतात मोठ्या प्रमाणावर वितरीत केलेली प्रजाती आहे परंतु पंखांवर ओळखणे कठीण आहे.(पुढे चालू)

श्री. विश्वास सावरकर यांच्या मुळ लेखाचा संगणकीय अनुवाद.

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र.पुणे
संपादन - एस. के. गवळी